पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय,
क्रमांक : नस/४/कावि/७३९/२०१४
दिनांक : ०२/०९/२०१४

प्रति,

मा. ........................................
सदस्य, पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

विषय : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची विशेष महापालिका सभा (विशेष बैठक) दिनांक - १२/०९/२०१४ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित केलेबाबत....

मा.महोदय/महोदया,

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १९ अन्वये मा.महापौर व मा.उपमहापौर यांची निवड करण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका (महापौर आणि उपमहापौर या पदांसाठी निवडणुका घेणे) नियम २००५ मधील नियम क्र.३(१) (२) अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची विशेष महापालिका सभा (विशेष बैठक) शुक्रवार दिनांक १२/०९/२०१४ रोजी सकाळी ११.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित केली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत : १) कार्यालयीन नोटीस बोर्ड
२) सर्व शाखा प्रमुख व शाखाधिकारी

<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कामाकरिता</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

## सूचना

(मुंबई प्रांतिक महानगरपालिका (महापौर आणि उपमहापौर या पदांसाठी निवडणुका घेणे) नियम २००५ मधील नियम क्र.३ (१) (२) व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची प्रकरण २ मधील नियम क्र.१ (एच)(आय) अन्वये )

## कार्यपत्रिका क्रमांक - ३४

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १९ अन्वये मा.महापौर व मा.उपमहापौर यांची निवड करण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका (महापौर आणि उपमहापौर या पदांसाठी निवडणुका घेणे) नियम २००५ मधील नियम क्र.३ (१) (२) अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची विशेष महापालिका सभा (विशेष बैठक) शुक्रवार दिनांक - **१२/०९/२०१४** या दिवशी सकाळी **११.००** वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आलेली आहे.सदर सभेत खालील कामकाज होईल.


## निवडणुका

**विषय क्रमांक १)** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १९ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे मा.महापौर व मा.उपमहापौर यांची निवड मुंबई प्रांतिक महानगरपालिका (महापौर आणि उपमहापौर या पदांसाठी निवडणुका घेणे) नियम २००५ प्रमाणे करणे.

(टिप - १) महाराष्ट्र महानगरपालिका (महापौर पदांचे आरक्षण) नियम २००६ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे महापौर पदाकरिता आरक्षण “ **अनुसुचित जमाती** ” असे आहे.)

२) मुंबई प्रांतिक महानगरपालिका (महापौर आणि उपमहापौर या पदांसाठी निवडणुका घेणे) नियम २००५ मधील नियम क्र.५ अन्वये मा.महापौर व मा.उपमहापौर यांची निवड करण्यासाठी विशेष बैठकीच्या अध्यक्षस्थानी मा.विभागीय आयुक्त अथवा त्यांचा प्रतिनिधी असेल.)

------



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय,
क्रमांक : नस/४/कावि/७३९/२०१४
दिनांक : ०२/०९/२०१४

---

( टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस्) मा.नगरसचिव यांचे कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)